<u>न्यायनिर्णय</u>

| | |
|---|---|
| MHSN090001132018 | दाखल दिनांक – २५.०१.२०१८<br>नोंदणी दिनांक – २५.०१.२०१८<br>निकाल दिनांक –०७.०३.२०२६<br>कालावधी – ८ वर्षे १ महिने १० दिवस |

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय तासगांव यांच्या न्यायालयात**<br><br>(पिठासीन अधिकारीः–सतिष वाय. वाकचौरे)<br>(घोषित दिनांक ०७.०३.२०२६)<br><br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५५/२०१८, नि.क्र.– ५१**<br>**गु.र.क्र. – ४८१/२०१७ पोलीस स्टेशन तासगांव**<br>भारतीय दंड विधान कायदा कलम २७९ व ४२७ तसेच मोटार वाहन कायदा, कलम १८४/१७७ व ३(१)/१८१ अन्वये. |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता | श्रीमती व्ही.ए.पाटील. |
| आरोपी | **भूषण तुकाराम पवार.**<br>वय : २५ वर्षे धंदाः चालक,<br>रा. जरंडी, ता. तासगांव, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. एम.एम.मुजावर. |
| **भाग–ब** | |
| गुन्हयाची तारीख | २६.११.२०१७ |
| पहिली खबर दिनांक | २६.११.२०१७ |

| | |
|---|---|
| गुन्हा दाखल तारीख | २६.११.२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २५.०१.२०१८ |
| निविदा नोंदविल्याची दिनांक | १२.०७.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७.०१.२०२० |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयांचा दिनांक | ०७.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भूषण तुकाराम | फौ.प्र.सं. कलम | निरंक | भा.द.वी. कायदा कलम | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पवार | ४१–अ प्रमाणे नोटीस | | २७९ व ४२७ तसेच मो. वा. का. कलम १८४/१७७ व ३(१)/१८१ | केले. | | |

## भाग–क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | खुदबुद्दीन गुलाब मुजावर | पंच साक्षीदार | ११ सोबत |
| २ | जनार्दन मोहनराव देशमुख | फिर्यादी | ११ सोबत |
| ३ | आक्रम बाळू मुजावर | पंच साक्षीदार | ११ सोबत |
| ४ | प्रमोद आत्माराम कोळी | साक्षीदार | ११ सोबत |
| ५ | रफिक इस्माईल पठाण | साक्षीदार | ११ सोबत |
| ६ | सुभाष सिताराम चव्हाण | साक्षीदार | ११ सोबत |
| ७ | काकासो आण्णा रुपनर | तपास अधिकारी | ११ सोबत |

### ब. बचाव साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार व इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार,<br>वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी</u>**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २४ | फिर्याद (साक्षीदार क्र. २) |
| २ | ३६ | तपासाकामी दिलेला लेखी आदेश<br>(साक्षीदार क्र. ७) |
| ३ | ३७ | घटनास्थळ  पंचनामा. (साक्षीदार क्र. ७) |
| ४ | ३८ व ३९ | अपघातातील दोन्ही वाहनांचे मॅकेनिकल तपासणी प्रमाणपत्र  (साक्षीदार क्र. ७) |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ३३ | एस.टी.बसच्या रोजनाम्याची प्रत |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ४७ | आरोपीचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३ अन्वये निवेदन |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : ०७.०३.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९ व ४२७ तसेच मोटार वाहन कायदा, कलम १८४/१७७ व ३(१)/१८१ अन्वये चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२) दिनांक २६.११.२०१७ रोजी दुपारी १.१५ वाजता फिर्यादी हे एस.टी.क्र.एम.एच.१४.बी.टी.११४१ ही जत ते शिराळा घेवुन जात होते. त्यावेळी त्यांच्यासोबत वाहक रफिक इस्माईल पठाण होते. दुपारी २.४५ वाजता सदर एस.टी. मणेराजुरी गावच्या हद्दीत जाधव मळा येथे असताना, तासगांव ते मणेराजुरीकडून एक कंटेनर जोरात येत होता. रस्ता अपूरा व वळणदार असल्याने फिर्यादी हे एस.टी. रस्त्याच्या खालच्या बाजूस घेवुन थांबले असता, समोरुन येणारा कंटेनर एस.टी.जवळून पास होत असताना, त्या कंटेनरचा हुक अडकून एस.टी.चा उजव्या बाजूचा कोपरा व गाडीचा पत्रा उचकटून तीन चॅनल वाकून गाडीचे नुकसान झाले आहे. फिर्यादी व वाहक पठाण यांनी गाडीच्या खाली उतरुन गाडीचा नंबर पाहिला असता तो एम.ए.१४ सी.पी. ७९५४ असा होता. त्यावेळी रक्कम रुपये २०,०००/- इतके गाडीचे नुकसान झाले. घडलेला प्रकार फिर्यादीने एस.टी.डेपोमध्ये कळविला व त्यानंतर पोलीस ठाण्यात जावुन तक्रार दिली.

३) सदरच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गु.र.क्र.-४८१/२०१७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास पुर्ण करुन

आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले आहे.

४) आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कायदा, १८६० चे कलम २७९ व ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४/१७७ व ३(१)/१८१ अन्वये निवेदन निशाणी क्र. ११ वर निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५) प्रस्तुतचा गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे वर नमूद एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द आक्षेपाहार्य विधान आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. ४७ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने सदरचा खोटा गुन्हा त्याच्याविरूध्द दाखल झाल्याचा बचाव घेतला आहे.

६) अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती व्ही.ए.पाटील व आरोपीतर्फे वकील श्री. एम.एम.मुजावर यांचा युक्तिवाद ऐकला.

७) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षाचे कथन लक्षात घेवून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २६.११.२०१७ रोजी १४.४५ वाजेच्या दरम्यान जाधव मळा मणेराजुरी, ता. तासगांव, जि. | |

| | | |
|---|---|---|
| | सांगली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर क्र. एम एच १४ सी.पी.–७९५४ हा मानवी जिवीतास धोका होईल अगर नुकसान होईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने अगर निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर चालविला आणि भारतीय दंड विधान कायदा कलम २७९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| २. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटनेकर क्र. एम एच १४ सी.पी.–७९५४ हा सार्वजनिक मालमत्तेला किंवा एखादया व्यक्तीला गैरहानी किंवा नुकसान पोहोचविण्याच्या उददेशाने किंवा आपण नुकसान पोहोचविण्यास कारण होवु शकतो अशी जाणीव असतानाही फिर्यादीच्या ताब्यातील एस.टी.बस क्र. एम.एस.१४. बी.टी.११४१ चे रक्कम रुपये २०,०००/– चे नुकसान केले आणि भारतीय दंड विधान कायदा कलम ४२७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ३. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याला सार्वजनिक रस्त्याची परीस्थीती माहिती असतानाही त्याने त्याच्या ताब्यातील कंटेनर धोकादायकरीत्या चालविला आणि मोटार वाहन कायदा कलम १८४/१७७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ४. | वर नमूद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही कंटेनर क्र. एम.एच.१४ सी.पी. ७९५४ हा सार्वजनिक रस्त्यावर चालविला आणि मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

८) आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे वर वर्णन केल्याप्रमाणे एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. याव्यतिरीक्त अभियोग पक्षाने आपली भिस्त निशाणी क्र. २४ वरील फिर्याद, निशाणी क्र. ३६ वरील तपासाकामी मिळालेला आदेश, निशाणी क्र. ३७ वरील घटनास्थळ पंचनामा तसेच निशाणी क्र. ३८ व ३९ वरील अपघातामधील दोन्ही वाहनांचे मॅकेनिकल तपासणी प्रमाणपत्र या कागदपत्रांवर ठेवली आहे. आरोपीने सदर प्रकरणात कोणताही पुरावा दिलेला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :**

९) मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांच्या कारणांची तसेच पुराव्याची पुनरावृत्ती होवू नये म्हणून मी सर्व मुद्यांचे विवेचन एकत्रित करत आहे.

१०) सदर प्रकरणामध्ये आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता खालील बाबी अभियोग पक्षाने सर्वप्रथम सिध्द करणे आवश्‍क आहे.

अ) आरोपी हा अपघात झालेल्या कंटेनरचा चालक होता.

ब) आरोपीने हयगयीने अगर निष्काळजीपणाने सदर कंटेनर चालवून बेदरकारपणाचे कृत्य केले.

क) आरोपीने सदर कंटेनर चालवताना इतरांचे जीवन अगर व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल असे कृत्य केले.

ड) आरोपीने त्याच्या बेदरकारपणाच्या कृत्याने फिर्यादीच्या ताब्यातील एस.टी.बस चे रक्कम रुपये २०,०००/– चे नुकसान झाले.

इ) आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर बेपरवा इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने धोकादायकरीत्या चालवला.

ई) आरोपीने त्याच्या ताब्यातील कंटेनर कोणताही चालक परवाना नसताना धोकादायकरीत्या सरकारी रस्त्यावर चालविला.

११) आरोपीविरूध्द गुन्हयाचे घटक सिध्द झाले आहेत किंवा नाही हे पाहण्याकरीता अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते.

१२) खुदबुद्दीन गुलाब मुजावर साक्षीदार क्र. १ व अक्रम बाळू मुजावर साक्षीदार क्र. ३ हे दोन्ही प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असुन त्यांनी अभियो पक्षास मदत होईल किंवा फिर्यादीच्या जबाबास पुष्टी देता येईल असे कोणतेही विधान पुराव्यादरम्यान केलेले नाही. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारांना फितूर घोषीत करुन त्यांचा उलट तपास घेतला परंतू उलट तपासादररम्यान दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान केलेले नाही.

१३) जर्नादिन मोहनराव देशमुख, साक्षीदार क्र. २ हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.११.२०१७ रोजी

ते शिराळा आगारात नोकरीस होते. सदर दिवशी ते शिराळा–जत–शिराळा ही एस.टी.बस चालवित होते. त्यांच्यासोबत वाहक रफीक इस्माईल पठाण हे होते. त्यांच्या ताब्यातील एस.टी.बसचा क्रमांक एम.एच.१४ बी.टी.११४१ असा होता. ते जतहून शिराळाकडे जात असताना दुपारी २.४५ वाजण्याच्या सुमारास योगेवाडीच्या हद्दीत एका वळणावर त्यांच्या समोरुन कंटेनर आला. त्यामुळे त्यांनी त्यांची बस जेवढी रस्त्याच्या कडेला घेता येईल तेवढी घेतली. त्यावेळी कंटेनर बसजवळून जात असताना, कंटेरचा हुक बसच्या चालकाच्या बाजूने पाठीमागील बाजूस लागला. त्यामुळे बसचा पत्रा व बॉडीचे तीन चॅनल तुटले. सदर कंटेनरचा क्र. १४ सी.पी.७९५४ असा होता. त्यावेळी कंटेनर चालक पळून गेला होता.

१४) सदर साक्षीदाराने उलट तपासादरम्यान असे कथन केले आहे की, योगेवाडीकडून मणेराजूरीकडे जाणारा रस्ता पूर्णतः काटकोनात वळतो. त्यामुळे समोरुन येणारी वाहने दिसत नाहीत. सदर रस्ता अरुंद असुन वर्दळीचा आहे व तेथे सतत वाहने येतात. कंटेनर हा बसच्या उजव्या बाजूने जात होता. बसमध्ये भरपूर प्रवासी होते. अपघातादरम्यान प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही. त्यांच्या फिर्यादमध्ये आरोपीने निष्काळजीपणे, हयगयीने व रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहन चालविले असे नमुद नाही. घटनेच्या वेळी कंटेनर कोण चालवित होते हे त्यांना माहित नाही. आरोपीला सर्वप्रथम त्यांनी न्यायालयात साक्षीपुराव्याच्या वेळी पाहिले. याव्यतीरिक्त विचारलेल्या सर्व उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१५) प्रमोद आत्माराम कोळी, साक्षीदार क्र. ४ यांच्या पुराव्यात असे आले

आहे की, दिनांक २६.११.२०१७ रोजी त्यांची डयुटी तासगांव ते मिरज बसवर होती. जत ते शिराळा बस क्र. एम.एच.१० बी.टी.११४१ या बसमधून दुपारी २.०० वाजता बसून जात असताना ती बस दुपारी २.४५ वाजता मणेराजुरी गावच्या हद्दीत जाधव मळा येथे आली. त्यावेळी समोरुन भरधाव वेगाने जाणा–या कंटेनरचा हुक एस.टी.च्या चालकाच्या बाजूच्या पाठीमागच्या खिडकीला अडकला व त्यामुळे एसटी चा पत्रा फाटला. तेव्हा एस.टी.मधील सर्व प्रवाशी खाली उतरले. सदर कंटनेर हा अर्धा कि.मी. अंतरावर कवठे महांकाळ रोडवर मिळून आला, त्याचा क्र. एम.एच.१४ सी.पी. ७९५४ असा होता. त्यांनी कंटेरन चालकास पाहिले होते. परंतू, त्याचे नाव त्यांना समजले नाही. कंटेनर चालकास त्यांनी ओळखले.

१६) सदर साक्षीदाराने उलट तपासादरम्यान असे कथन केले आहे की, योगेवाडी ते मणेराजूरी हा रस्ता पूर्ण काटकोनात असुन त्याच्या आजूबाजूला पूर्ण झाडे आहेत. साक्षीदाराने त्या दिवशी पोलीसांना त्याचे ओळखपत्र दिले होते. बसमध्ये बरेच प्रवाशी होते. त्या दिवशी त्यांची डयुटी तासगांव ते कवठे महांकाळ रोडवर होती. आरोपी भरधाव वेगाने आला हे त्यांच्या तपास टिपणामध्ये नमुद नाही. तासगांव ते कवठेमहांकाळ हा रस्ता रहदारीचा असुन त्यावरुन बरीच वाहने ये जा करतात. याव्यतीरिक्त विचारलेल्या सर्व उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१७) रफिक इस्माईल पठाण, साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.११.२०१७ रोजी ते एस.टी. बस क्र. एम.एम. १० बी.टी.११४१ या बसवर वाहक म्हणून कर्तव्यावर होते. फिर्यादी जनार्दन देशमुख हे सदर बस चालवित होते. दुपारी १.४५ वाजता सदर बस तासगांववरुन निघाली.

दुपारी २.४५ वाजता ती बस जाधव मळा मणेराजुरी येथे असताना, तेथे अपूरा वळणदार रस्ता होता. चालकास समोरुन कंटेनर येताना दिसला म्हणून त्यांनी एस.टी.बस डाव्या बाजूला रस्त्याच्या कडेला थांबविली. कंटनेर बसजवळून जात असताना, कंटेनरचा डाव्या बाजूचा हूक एस.टी.बसच्या उजव्या बाजूच्या पत्रयाला अडकला. त्यामुळे पत्रा व बाकडे उचकटली. कंटेनर पूढे जावुन थांबला होता. कंटेनर चालकाने त्याचे नाव भूषण पवार असे सांगितले होते. कंटेनरचा क्रमांक त्यांना आठवत नाही.

१८) सदर साक्षीदाराने उलट तपासादरम्यान असे कथन केले आहे की, दिनांक २६.११.२०१७ रोजी ते बस क्र. एम.एच.१० बी.टी.११४१ या बसवर वाहक म्हणून कर्तव्यावर होते, याचा कागदोपत्री पुरावा त्यांनी पोलीसांना दिलेला नाही. योगेवाडी ते मणेराजूरी हा रस्ता पूर्ण काटकोनात असून आजूबाजूला झाडे आहेत. कंटेनर त्याच्या योग्य दिशेने होता. बसच्या रोजनाम्याची प्रत त्यांना दाखविली असता, त्यावर चालक व वाहकाची सही नाही. तसेच जाण्याच्या वेळेमध्ये देखील खाडाखोड असुन एस.टी.चा पूर्ण क्रमांक नाही हे त्यांनी मान्य केले आहे. बसमध्ये बरेच प्रवाशी होते. या व्यतीरिक्त विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१९) सुभाष सिताराम चव्हाण, साक्षीदार क्र. ६, याच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.११.२०१७ रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास ते मणेराजूरी येथून योगेवाडीकडे त्यांच्या मोटारसायकलवरुन जात होते. ते जाधव मळयाजवळ

आले असता, तेथे एक एस.टी. थांबलेली होती. एका कंटेनरने सदर एस.टी.च्या मागील बाजूस घासलेले होते. त्यामुळे एस.टी.चा पत्रा फाटला होता. तसेच कंटेनरचा अॅंगलही वाकला होता. कंटेनर चालकास त्यांनी पाहिलेले नाही. सदर साक्षीदाराचा उलट तपास घेण्यासाठी आरोपी व आरोपीचे वकील गैरहजर असल्याने साक्षीदाराचा उलट तपास झाला नाही.

२०) काकासो आण्णा रुपनर, साक्षीदार क्र. ७ हे प्रस्तुत प्रकरणातील तपासी अधिकारी असुन, त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर घटनेचा तपास त्यांच्याकडे लेखी आदेशाने आला होता. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तसेच दोन्ही वाहनांचे तांत्रीक तपासणी करुन प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

२१) सदर साक्षीदाराच्या उलट तपासात असे आले आहे की, त्यांनी आरोपीला मोटार वाहन कायदा, कलम १३३ अन्वये नोटीस दिली नव्हती. त्यांनी काढलेल्या फोटोसोबत फोटोची पावती, फोटोग्राफरचे नाव व शिक्का व त्याचे निगेटीव्ह दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाही. आरोपीचा वाहन चालक परवाना दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही. मन्सुर नावाचा मेकॅनिक हा शासकीय मेकॅनिक नाही. आगार प्रमुखाचा जबाब त्यांनी घेतलेला नाही. एस.टी.मधील प्रवाशांचे जबाब त्यांनी घेतलेले नाहीत. एस.टी. चालक व वाहक यांचे घटनेच्या दिवशीचे हजेरीपत्रक त्याने दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाही. स्टेशनडायरीचा उतारा दोषारोप पत्रासोबत दाखल केलेला नाही. घटनास्थळाच्या नकाशावर त्यांची किंवा

पंचाची सही नाही. प्रमोद आत्माराम कोळी हे बसमध्ये होते हे दाखविणारा कोणताही पुरावा त्यांनी दोषारोप पत्रासोबत जोडलेला नाही. मणेराजूरी ते योगेवाडी हा रस्ता वर्दळीचा असुन त्यावर सतत लोकांची ये–जा असते. वाहतुक नियंत्रक तासगांव यांचा जबाब त्यांनी नोंदविलेला नाही. तथाकथीत रस्ता अरुंद असुन तो घटनास्थळाजवळ काटकोनात वळतो. त्यामुळे योगेवाडीकडून येणारे वाहन खालच्या व्यक्तीला दिसत नाही. कंटेनर हे अवजड वाहन होते व ते १२ फूट लांबीचे होते. या व्यतीरिक् विचारलेल्या सर्व उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता.</u>**

२२) मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असुन त्यांच्या कारणांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदर तीनही मुद्दे एकत्रीत विचारात घेत आहे.

२३) एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, आरोपी हा अपघात झालेल्या कंटेनरचा चालक होता व तो त्याच्याकडे चालक परवाना नसताना सदर कंटेनर चालवत होता. त्या अनुषंगाने अभिलेखावर आलेला पुरावा पाहिला असता, असे दिसुन येते की, निशाणी क्र. २४ वरील फिर्यादमध्ये फिर्यादीने कंटेनर चालकास पाहिले होते असे आरोपीचे कथन नाही. जनार्दन देशमुख साक्षीदार क्र. २ फिर्यादी यांनी त्यांच्या जबाबामध्ये कंटेनर चालक पळून गेला होता असे कथन केले आहे. तसेच त्यांनी उलट तपासादरम्यान सदर कंटेनर कोण चालवित होता हे त्यांना माहिती नाही असे कथन केले आहे. परंतू, प्रमोद कोळी साक्षीदार क्र. ४ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन

त्यांनी मात्र सदर कंटेनर हा अर्धा किमी अंतरावर कवठे महांकाळ रोडवर मिळून आला व त्यांनी कंटेनर चालकास पाहिले होते असे सांगितले. रफीक पठाण साक्षीदार क्र. ५ हे एस.टी.चे वाहक असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये कंटेनर पुढे जावुन थांबला होता, कंटनेरच्या चालकाने त्याचे नाव भूषण पवार असल्याचे सांगितले. सुभाष चव्हाण साक्षीदार क्र. ६ याने त्याच्या पुराव्यामध्ये कंटेनर चालकास त्याने पाहिले नसलयाचे सांगितले.एकंदर अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपी हा अपघातातील कंटेनर चालवित होता याबाबत विसंगती आढळून येते. तपास अधिकारी यांनी आरोपीकडे चालक परवान्याबाबत तपास केला, असे कथन केलेले नाही. तपासी अधिकारी यांनी वाहन चालकाचे पूर्ण नाव व पत्ता तसेच चालक परवाना हे सदर चालकाची ओळख पटविण्याकरीता आवश्यक असतानाही मोटार वाहन कायदा कलम १३३ अन्वये नोटीस दिलेली नसल्याचे पुराव्यादरम्यान मान्य केले आहे. एकंदर अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी हा अपघातातील कंटेनर त्याच्याकडे कोणताही चालक परवाना नसताना चालवित होता याबाबत संशय निर्माण होतो.

२४) अभियोग पक्षाचे असे ही कथन आहे की, आरोपीने हयगयीने अगर निष्काळजीपणे सदर कंटेनर चालवुन बेदरकारपणाचे कृत्य केले व इतरांचे जिवन अगर व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल अशा पध्दतीने धोकादायकरीत्या कंटेनर चालविला. त्या अनुषंगाने अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, निशाणी क्र. २४ वरील फिर्यादमध्ये समोरुन एक कंटेनर जोरात आला असे नमुद आहे. परंतू जनार्दन देशमुख साक्षीदार क्र. २ फिर्यादी यांनी मात्र

सदर कंटेनर हा जोरात आला किंवा भरधाव वेगाने आला असे कोणतेही कथन पुराव्यादरम्यान केलेले नाही. यावरुन सदर साक्षीदाराच्या पुराव्यामध्ये कंटेनर हा जोरात किंवा भरधाव वेगाने आला याबाबत विरोधाभास दिसुन येतो. एस.टी. वाहक रफीक पठाण साक्षीदार क्र. ५ यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी आरोपीने भरधाव वेगाने अगर हयगयीने कंटेनर चालवून बेदरकारपणाचे कृत्य केले व इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले असे कुठेही सांगितलेले नाही. प्रमोद कोळी साक्षीदार क्र. ४ यांनी मात्र त्यांच्या पुराव्यामध्ये कंटेनर हा समोरुन भरधाव वेगाने आला असे कथन केले आहे. वरील पुराव्यावरुन समोरुन येणारा कंटेनर भरधाव वेगाने किंवा जोरात येत होता अगर कंटेनर चालक हा सदर कंटेनर बेदरकारपणे धोकादायकरीत्या चालवत होता याबाबत अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यामध्ये विसंगती दिसुन येते.

२५) अभियोग पक्षातर्फे जनार्दन देशमुख साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये योगेवाडीकडून मणेराजूरीकडे जाणारा रस्ता हा संपूर्ण काटकोनात वळतो. त्यामुळे समोरुन येणारी वाहने दिसत नाहीत असे कथन केले आहे. प्रमोद कोळी साक्षीदार क्र. ४ व एस.टी.वाहक रफीक पठाण, साक्षीदार क्र. ५ यांनी देखील त्यांच्या उलट तपासामध्ये सदर रस्ता हा काटकोनात असुन आजूबाजूला झाडे आहेत असे कथन केले आहे. काकासो रुपनर साक्षीदार क्र. ७ तपास अधिकारी यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये कंटेनर हे अवजड वाहन होते व ते १२ फूट लांबीचे होते असे कथन केले आहे. यावरुन अवजड वाहन असलेला १२ फूट लांबीचा कंटेनर हा

समोरुन भरधाव वेगाने येत होता याबाबत संशय निर्माण होतो. आरोपीतर्फे वकीलांनी अभिलेखावर दाखल केलेल्या Badriprasad Tiwari Vs. The State 1994, Cri.L.J.389 या न्यायनिर्णयामध्ये मा. ओरीसा उच्च न्यायालयाने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल अशा पध्दतीने हयगयीने व बेदरकारपणे आरोपीने वाहन चालविले हे गुन्हयाचे घटक सिध्द होणे आवश्यक आहे. केवळ चुकीने किंवा निष्काळजीपणे घटना घडली हे पुरेसे नाही असा निष्कर्ष नोंदविला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी हा सदर कंटेनर चालवित होता ही बाब अभियोग पक्ष संशयापलीकडे जावुन सिध्द करु शकलेला नाही. तसेच गुन्हयाचे कोणतेही घटकही अभियोग पक्षाने संशयापलीकडे जावुन सिध्द केलेले नसल्याने प्रस्तुत न्यायनिर्णयाची आरोपीला सदर केसमध्ये मदत होताना दिसते.

२६) अभियोग पक्षाचे असेही कथन आहे की, आरोपीने बेदरकारपणे व निष्काळजीपणे कंटेनर चालवुन एस.टी.बसचे रक्कम रुपये २०,०००/- चे नुकसान केले आहे. याबाबत आलेला पुरावा पाहिला असता,त्यावरुन असे दिसुन येते की, मन्सुर मेकॅनिक यांचेकडून दोन्ही वाहनांचा नुकसानीबाबत हस्तगत केलेले प्रमाणपत्र तपास अधिकार यांनी अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदर प्रमाणपत्र हे आरोपीतर्फे वकीलांनी मान्य केले आहे. त्याप्रमाणे निशाणी क्र. ४५ वरील एस.टी.बसच्या नुकसानीचे प्रमाणपत्र पाहिले असता, त्यामध्ये एस.टी.बसचे रक्कम रुपये २०,०००/- इतक्या किमतीचे नुकसान झाले असे नमुद नाही. तसेच तपास अधिकारी यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये मन्सुर मॅकेनिक हा शासकीय मॅकेनिक नाही असे कथन केले आहे. तसेच सदर मॅकेनिकचा पुरावा अभियोग पक्षाने

नोंदविलेला नसल्याने त्याला वाहनांच्या नुकसानाबाबत ज्ञान आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. त्यामुळे अभिलेखावरील निशाणी क्र. ४५ च्या प्रमाणपत्रावर विश्वास ठेवुन एस.टी.बसचे रक्कम रुपये २०,०००/- चे नुकसान झाले आहे असे म्हणणे उचित ठरणार नाही.

२७) अभिलेखावर आलेल्या तोंडी पुराव्यामध्ये जनार्दन देशमुख साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कंटेनरचा हुक बसला लागल्यामुळे बसचा पत्रा उचकटून तीन चॅनल तुटल असे कथन केले आहे. रफीक पठाण साक्षीदार क्र. ५ वाहन चालक यांनी कंटेनरचा हुक लागून पत्रा व बाकडे उचकटले असे सांगितले आहे. प्रमोद कोळी साक्षीदार क्र. ४ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी मात्र कंटेनरचा हुक लागून एस.टी.चा पत्रा फाटला असे कथन केले आहे. सुभाष चव्हाण साक्षीदार क्र. ६ यांनी एस.टी.चा पत्रा फाटला होता तसेच कंटेनरचा चॅनल देखील वाकला होता असे कथन केले आहे. वरील सर्व पुरावा पाहता अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यामध्ये एस.टी.बसच्या नुकसानाबाबत एकवाक्यता दिसुन येत नाही. घटनास्थळ पंचनाम्यासाठी हजर असलेले दोन्हीही पंच अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान करीत नाहीत. घटनास्थळाच्या नकाशावर तपास अधिकारी व पंचाची सही नाही. या सर्व बाबीवरुन अभियोग पक्षाने आरोपीने कंटेनर चालवुन एस.टी.बसचे रक्कम रुपये २०,०००/- चे नुकसान केले याबाबत संशय निर्माण होतो. वर विवेचन केल्याप्रमाणे सदर कंटेनर हा आरोपी चालवित होता ही बाब अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द केली नसल्याने आरोपीच्या चुकीमुळे एस.टी.बसचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही.

२८) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी त्यांच्या उलट तपासामध्ये घटनास्थळ हे अरुंद रस्ता असुन तेथे काटकोनात वळण आहे. तसेच तो नेहमी वर्दळीचा रस्ता आहे. त्याचप्रमाणे एस.टी.बसमध्ये देखील आणखी प्रवाशी होते असे सांगितले आहे. परंतू, तपासी अधिकारी यांनी एस.टी.बसमधील कोणत्याही प्रवाशाचे जबाब नोंदविलेला नाही. एस.टी.चालक व वाहक यांचे त्या दिवशीचे हजेरीपत्रक दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले नाही. वाहतुक नियंत्रक तासगांव यांचा जबाब नोंदविलेला नाही. अभियोग पक्षाने घटनास्थळ देखील पुराव्यानिशी सिध्द केलेला नाही. यावरुन अभिलेखावर आलेल्या पुराव्यातून आरोपीने त्याच्याकडे वाहन चालक परवाना नसताना त्याच्या ताब्यातील कंटेनर हयगयीने भरधाव वेगाने चालवुन बेदरकारपणाचे कृत्य केले तसेच सदर कंटेनर धोकादायकरित्या चालवुन मानवी जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले ही बाब अभियोग पक्ष संशयापलीकडे जावुन सिध्द करु शकलेला नाही. वरील सर्व बाबी विचारात घेऊन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, अभियोग पक्षाने अरोपीविरुध्द गुन्हयाचे कोणतेही घटक संशयापलीकडे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी हा प्रस्तुत गुन्हयातून संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो या मतांपर्यंत मी येऊन पोहचलेलो असल्याने मुद्दा क्र. १ व ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ५ चे उत्तरार्थ, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी भूषण तुकाराम पवार याची भारतीय दंड विधान कलम २७९ व ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४/१७७ व ३(१)/१८१ मधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये आरोपीने रु.२०,०००/– चा जामीन देण्याची पुर्तता करावी.

**( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.07 17:17:20 +0530

तासगांव. ( एस.वाय. वाकचौरे )
दिनांकः ०७.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer : Abhay Arvind Randive.

Court : Shri. S.Y. Wakchaure
J.M.F.C., Tasgaon.

Date : 07.03.2026

Judgment signed by the presiding officer on : 07.03.2026

Judgment uploaded on : 07.03.2026